**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार, दिनांक २४ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **सर्वोच्च न्यायालयातर्फे येत्या एकोणतीस जुलै ते तीन ऑगस्ट दरम्यान विशेष लोक अदालतीचं आयोजन तर महाराष्ट्रासह नागपुरात २७ जुलै रोजी भरणार राष्ट्रीय लोक अदालत.**
2. **तेलंगणाप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करा: महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांची मागणी.**
3. **नागपुरात रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लाँट विभागाद्वारे विशेष चमू कार्यरत.**
4. **नागपूर, गोंदिया आणि गडचिरोलीत उद्या मुसळधार पावसाची शक्यता - चंद्रपूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे ७७८ गावे बाधित.**

****

लोक अदालत सर्वोच्च न्यायालय

प्रलंबित खटले निकाली काढण्याच्या तसंच मध्यस्थातर्फे खटले सामोपचारानं मिटवण्याच्या दृष्टीनं एक महत्त्वाचं पाऊल उचलत सर्वोच्च न्यायालयानं येत्या एकोणतीस जुलै ते तीन ऑगस्ट दरम्यान विशेष लोक अदालतीचं आयोजन केलं आहे. हा उपक्रम सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेच्या 75 व्या वर्षाच्या अनुषंगाने घेण्यात येत आहे. ज्या लोकांचे खटले सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असं सरन्यायाधीश डी.वाय.चंद्रचूड यांनी केलं आहे.या बद्दल सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांचे आवाहन आपण ऐकुया -

***इस साल २९ जुलाई से ३ अगस्त तक भारत के सर्वोच्च न्यायालयने लोक अदालत का आयोजन किया है । इस साल सर्वोच्च न्यायालय अपने ७५ वे वर्ष की वर्षगांठ पर इस स्पेशल लोक अदालत का आयोजन करते हुए ये ध्यान में हमने रखा है  की सुप्रीम कोर्ट में काफी मामले नागरिकों के प्रलंबित है और मै आज सबसे गुजारिश करता हु, लिटिगंस से गुजारिश करता हु, वकीलों से की इस लोक अदालत में आप हिस्सा ले ताकि ये सारे जो मामले है इनमें हम निवारण करने और शीघ्र लोगों को न्याय पहुचाये।***

27 जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्रात उच्च न्यायालय व त्यांची सर्व खंडपीठ, जिल्हा न्यायालय, सर्व न्यायाधीकरण आणि तालुका न्यायालयांच्या ठिकाणी एकाच वेळी राष्ट्रीय लोक अदालत होणार आहे. नागपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या वतीने 27 जुलै रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचं  आयोजन करण्यात आलं  असून त्यामध्ये नागपूर जिल्हयातील 1 लाखांपेक्षा जास्त न्यायालयीन प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली  आहेत. सर्व संबंधीत पक्षकारांनी लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून लाभ घ्यावा, असं आवाहन प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश सचिन पाटील यांनी केलं आहे.

राष्ट्रपती दौरा

येत्या सोमवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मुंबईत विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात आजी माजी आमदारांना संबोधित करणार आहेत. यावेळी त्यांच्या हस्ते २०१७-१८ पासून प्रलंबित असलेले उत्कृष्ठ संसदपटू आणि सदस्यांना उत्कृष्ट भाषणासाठीचे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज मुंबईत

वार्ताहर परिषदेत दिली. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते 'वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्व' या पुस्तकाचं प्रकाशन देखील होणार आहे, असं उप सभापती नीलम गोऱ्हे यांनी सांगितलं.

अश्विनी वैष्णव

संयुक्त पुरोगामी सरकारच्या काळात महाराष्ट्र सारख्या मोठ्या राज्याला 1हजार 171 कोटी रुपये इतका निधी अर्थसंकल्पात अंतर्गत मिळत होता. आता मोदींच्या काळात हा निधी 13 पटीने वाढला असून यावर्षी महाराष्ट्राला 15 हजार 940 कोटी रुपये मिळाल्याची माहिती रेल्वेमंत्री आणि माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नागपूर मध्ये प्रसार माध्यमांशी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून बोलताना दिली. महाराष्ट्रात एकूण 128 स्टेशन हे पुर्नविकासांतर्गत अमृत स्टेशन मध्ये रूपांतरित केल्या जात असून महाराष्ट्रातील रेल्वे नेटवर्कचे शंभर टक्के विद्युतीकरण झाले आहे,असेही वैष्णव यांनी सांगितले.

नीट-यूजी- रविशंकर प्रसाद

नीट-यूजी परीक्षेच्या मुद्यावर विरोधी पक्षाकडून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप, भारतीय जनता पक्षाने केला आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन, या मुद्याकडे लक्ष वेधलं. नीट यूजीच्या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकतेशी कोणतीही तडजोड झालेली नाही, यावर काल सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केल्याचं प्रसाद यांनी नमूद केलं. काल सादर झालेला अर्थसंकल्प, हा समाजाच्या प्रत्येक घटकासाठीचा अर्थसंकल्प असल्याचं प्रसाद यांनी म्हटलं आहे. विरोधी पक्षांनी अर्थसंकल्पावर टीका करण्यापूर्वी, तो वाचून समजून घेण्याची गरज प्रसाद यांनी व्यक्त केली.

संसद-अर्थसंकल्प निदर्शने

केंद्रीय अर्थसंकल्पात निधी वाटपात भेदभाव करण्यात आल्याचा आरोप करत इंडिया आघाडीने आज संसद भवनाच्या आवारात निदर्शने केली. सर्व राज्यांना समान न्याय द्यायला हवा अशी मागणी विरोधी पक्षांनी केली. केंद्रीय अर्थसंकल्पात निधीचं वाटप करताना विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांवर अन्याय झाल्याची टीका काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यसभेत केली. लोकसभेतही विरोधी पक्षांनी याच मुद्द्यावरून सभात्याग केला. लोकसभेचं कामकाज सुरू होताच इंडिया आघाडीच्या सदस्यांनी निदर्शने केली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षांच्या सदस्यांच्या या कृतीला आक्षेप घेतला. संसदेचं कामकाज सुरळीत चालावं यावर विरोधी पक्षांनी सर्वपक्षीय बैठकीत सहमती दर्शवली होती, त्यामुळे त्यांची ही कृती योग्य नसल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजु म्हणाले. दरम्यान केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रावर अन्याय झाला आहे, असा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून रमाबाईनगर, घाटकोपर इथं  निषेध आंदोलन करण्यात आलं.

संसद-निर्मला सीतारामन

केंद्रीय अर्थसंकल्पात निधी वाटप करताना काही राज्यांसोबत भेदभाव केल्याचा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी फेटाळून लावला. विरोधी पक्षांचं सरकार असणाऱ्या राज्यांना काहीही दिलं नाही असा भ्रम काँग्रेस पसरवत असल्याचं सीतारामण यांनी राज्यसभेत शून्य प्रहरातल्या चर्चेवेळी सांगितलं. अर्थसंकल्पाच्या भाषणावेळी प्रत्येक राज्याचं नाव घेणं शक्य नसतं. नाव घेतलं नाही म्हणजे त्या राज्यांना काहीच दिलं नाही असं नाही, असं सीतारामण यांनी स्पष्ट केलं.

लेखानुदान आणि कालच्या अर्थसंकल्पादरम्यान महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालमधल्या अनेक विकास प्रकल्पांना मंजुरी दिल्याचं त्यांनी सांगितलं.

संसद-खासदार प्रतिभा धानोरकर

लोकसभेत पहिल्यांदाच चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्रातून बहूमतांनी निवडून गेलेल्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आज आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बाबत सरकारपुढे प्रश्न उपस्थित केले. आज लोकसभेत शून्य तासात बोलताना शेतकऱ्यांप्रती असणारी उदासिनता दुर करुन शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त करावे अशी मागणी देखील धानोरकर यांनी सभागृहात केली.

नाना पटोले-कर्जमाफी

राज्यातील शेतकऱ्याला अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करावा लागत आहे. कठीण परिस्थितीत जीवन जगत असलेल्या बळीराजाला आधार देण सरकारचं कर्तव्य असून तेलंगणातील कॉँग्रेस सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमाफीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात महायुती सरकारने संकटात सापडलेल्या बळीराजाला सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. महायुती सरकारने कर्जमाफी केली नाही तर सत्तेवर येताच महाविकास आघाडी सरकार शेतकऱ्याला कर्जमाफी देईल, असं आश्वासन देखील पटोले यांनी दिलं.केंद्रीय अर्थसंकल्पात शेतक-यांना कर्जमाफी मिळेल अशी अपेक्षा होती पण केंद्र सरकारने शेतक-यांची घोर निराशा केली असंही पटोले म्हणाले.

आत्मसमर्पण

नक्षल्यांच्या भामरागड दलमचा सदस्य असलेल्या लच्चू ताडो या नक्षल्याने आज गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. शासनाने त्याच्यावर २ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. लच्चू ताडो हा गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील भटपार इथला रहिवासी असून, २०१२-१३ पासून तो गावात राहून जन मिलिशिया म्हणून नक्षल्यांना सहकार्य करीत होता. मागच्या वर्षी तो भामरागड दलमचा सदस्य झाला. त्याच्यावर जाळपोळ आणि जमिनीत स्फोटके पुरुन ठेवण्याचे दोन गुन्हे दाखल आहेत. आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत ६७० नक्षल्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं आहे, असं पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी सांगितलं.

इलेक्ट्रिक वेहिकल

राष्ट्रीय महामार्गांवरील इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग स्टेशनच्या संख्येत महाराष्ट्र आघाडीवर असून, सर्वाधिक 750 चार्जिंग स्टेशन महाराष्ट्रात उभारण्यात आले आहे. देशात महामार्गालगत राष्ट्रीय महामार्गालगत उभारण्यात आलेल्या 5 हजार 293 इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनचा राज्यवार तपशील नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. महाराष्ट्र पाठोपाठ उत्तर प्रदेशात सर्वाधिक 577 चार्जिंग स्टेशन, राष्ट्रीय महामार्गलगत उभारण्यात आले आहे.

खड्डे बुजविण्यासाठी विशेष चमू

नागपूर महानगर पालिकेने सिंमेट रस्त्याच्या तिसऱ्या टप्प्यातील बांधकामासाठी व्हीएनआयटीचे तंत्रज्ञ नेमले आहेत. रस्त्यातून पावसाच्या पाण्याचा विसर्ग होण्यासाठीच्या बांधकाम तंत्राबाबत हे तंत्रज्ञ मार्गदर्शन करतील. त्यानुसार मनपा अतिरिक्त निधीची तरतूद करेल, अशी माहिती

महानगर पालिकेचे आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी आज महानगरपालिकेत प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. मनपाच्या हॉट मिक्स प्लांट विभागाद्वारे 5 पथके नेमली असून प्रत्येक झोन निहाय एक पथक रस्त्यातील खड्ड्यांचे पॅचवर्क करत आहे. शहरात मलवाहिनी आणि स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज सुसुत्रता आणण्याकरिता नागनदी-जायका प्रकल्पाच्या अंतर्गतही मलवाहिन्या टाकल्या जाणार असल्याची माहिती चौधरी यांनी दिली .नाग नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी 2000 कोटी रुपयाचा निधी मिळाला असून हे काम 5 पॅकेज अंतर्गत निवीदा प्रक्रीया राबवून केलं जाणार असल्याचं आयुक्तांनी यावेळी स्पष्ट केलं.

हवामान

विदर्भात आज सर्वत्र कमी अधिक प्रमाणात पावसानं हजेरी लावली असून आज नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, यवतमाळ, अमरावती या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान उद्या देखील नागपूर, गोंदीया आणि गडचिरोली मध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या 24 तासात गडचिरोली इथं 101 पूर्णांक दोन मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून चंद्रपूर जिल्ह्यात 91 पूर्णांक 6 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे त्या पाठोपाठ गोंदिया जिल्ह्यात ७९ पूर्णांक ४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड नजीकच्या पर्लकोटा नदीला पुन्हा पूर आला असून, आलापल्ली-भामरागड मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे. तर अमरावती जिल्ह्यातील वरुड बगाजी इथल्या धरणाची तीन दारे ३० सेंटी मीटरने उघडण्यात आली असून एकूण विसर्ग ७७ पूर्णांक ८७घ.मी.प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग होत आहे. जिल्ह्यात अवघ्या तीन दिवसांमध्ये ५६ प्रकल्पांमध्ये ४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. भंडारा जिल्ह्यातील पाऊस थांबला असला तरी मध्य

प्रदेशच्या संजय सरोवर धरणाचे आणि गोंदिया जिल्ह्याच्या पुजारी टोला आणि धापेवाडा प्रकल्पाचे गेट उघडल्याने वैनगंगा नदी मध्ये पाण्याची पातळी वाढली असून गोसेखुर्द धरणाचे 05 गेट दोन मीटरने तर 28 गेट दीड मीटरने उघडण्यात आले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात सलग दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू असून अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात ७७८ गावे बाधित झाली असून सुमारे ११ हजार हेक्टरवरील शेती पिकांच्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज आहे.

******